नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १२/०४/२०२६ (रविवार)

---

## पोलीस ठाणे पाचगाव हद्दीतील मौजा वडद शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद, ६३ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन पाचगाव :– दिनांक १२/०४/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा वडद शिवारात अवैधरित्या रनिंग भट्टी द्वारे मोहाफुल गावठी दारु काढली जात आहे. मिळालेल्या माहीती च्या आधारे पोलीस पथकाने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली नमुद घटनास्थळी जावुन धाड टाकुन खलील प्रमाणे कारवाई केली.

महीला आरोपी हीचेवर कारवाई करत **रनिंग भट्टी नष्ट करून** घटनास्थळावरून २०० लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि ५० लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी मध्ये उकळलेले २०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, लोखंडी ड्रम, प्लास्टीक ड्रम, जळाउ लाकुड आणि इतर साहित्य जप्त केले.

**सदर कारवाईत पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण १) २०० लिटर मोहाफुल सडवा आणि २) ५० लिटर मोहाफुल गावठी दारू ३) एकुण १२ प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण ६३,०००/– रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**





## पोस्टे बुट्टीबोरी हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय नागपूर विभाग यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी :—** दिनांक ११/०४/२०२६ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, नागपूर विभाग येथील स्टाफ यांना गोपनीय माहिती मिळाली की, रितेश धरमचंद मोदी हा काही लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता रूईखैरी ताम येथे **आरोपी रितेश धरमचंद मोदी, वय ४९ वर्ष, रा. रूईखैरी ताम, जि. नागपुर** हा कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आला. पोलीसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम १७९०/— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले पेन असा एकुण १८००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपी रितेश धरमचंद मोदी, वय ४९ वर्ष, रा. रूईखैरी ताम, जि. नागपुर यांच्या विरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द
## एन.डी.पी.एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद

दिनांक ११/०४/२०२६ **रोजी** मौदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना **आरोपी कवडु सोमाजी आंबीलढुके वय ४५ रा. दहेगाव ता. मौदा** हा मौजा दहेगाव येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. तसेच **पोलीस स्टेशन सावनेर** अंतर्गत मौजा खानगाव रोड येथे आरोपी नामे लोकेश रूपचंद गाखरे, वय २६ वर्ष, रा. सावळी, जि. वर्धा हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमुद आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १० गुन्हे नोंद

दिनांक ११/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ६५३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १० गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे रोशन अरून डेकाटे, वय ३४ वर्ष, रा. डोंगेघाट खापा, ता. सावनेर याचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे राजकुमार जगलालजी जयस्वाल, वय ५० वर्ष, रा. दुर्गामाता मंदीर, सराणा लेआउट, नालवाडी वर्धा, ह. मु. चाकडोह ता. काटोल जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी क्र. १) नामे गौरव दिगांबर बावने, वय २४ वर्ष, रा. वार्ड क्र. ११, नरखेड २) आशिष नंदकिशोर कटारे, वय २६ वर्ष, रा. नरखेड, जि. नागपूर ३) शंकर किसन सोनबरसे, वय ७० वर्ष, रा. अंबाडा देशमुख, तह. नरखेड याचे वर प्रत्येकी ०१ असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी क्र. १) नामे सुरज विरेन्द्र पवार, वय २३ वर्ष, रा. उमठा, ता. नरखेड २) अनिल रमेश धपके, वय ४४ वर्ष, रा. विवरा, ता. नरखेड, जि. नागपूर ३) श्रीकृष्ण शंकरराव राउत, वय ३१ वर्ष, रा. पेठमूक्तापूर, ता. नरखेड, जि. नागपूर याचेवर प्रत्येकी ०१ असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे ०२ महिला आरोपी यांचे वर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, अशा १० आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १० गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ७५ लिटर मोहाफुल गावठी दारू २) १०८० मिली देशी दारू असा एकुण ६५३०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने